MHLA160000492021

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.०७/२०२१**
**शासन वि. गणेश**

−:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::−

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. सदर प्रकरण हे मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८५ च्या गुन्ह्याकरिता दि.२७/०१/२०२१ रोजी दाखल झाले. तेव्हापासून सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. त्यामुळे आरोपीला समन्स बजावणी झालेली नाही. आरोपी दिलेल्या पत्यावर मिळून येत नसल्याबाबत पोलीसांनी समन्स अहवाल सादर केलेला आहे. त्याप्रमाणे भविष्यात सुध्दा आरोपीवर समन्स बजावणी होणार याची शक्यता नाही. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:31:59 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – १३–०३–२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**देवणी.**